MHRG190009612023

**::भूसंपादन निर्देशन अर्ज क्र.४७/२०२० मधील निशाणी क्र.२२ वरील आदेश ::**

प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदार यांनी मुळ अर्जदार क्र.१४ मयत झाल्यानंतर त्यांचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ होऊन मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

२. अर्जदार यांचे कथन की, मुळ अर्जदार क्र.१४ हे दिनांक ०६.०५.२०२३ रोजी मयत झाले आहेत. मयत अर्जदार क्र.१४ यांचे वारस मुदतीत म्हणजेच दिनांक ०६.०८.२०२३ रोजीपर्यत अभिलेखावर घेणे आवश्यक होते परंतु अर्जदारांचे कायदेशीर वारस यांना प्रस्तुत रेफरन्स अर्जाबाबत काहीही माहिती नसल्याने त्यांनी वकीलांना मुळ अर्जदार क्र.१४ मयत झाल्याची माहिती मुदतीत दिली नाही. मुळ अर्जदार यांचे वकीलांनी अर्ज सुनावणीसाठी आल्याने मुळ अर्जदारास न्यायालयात हजर राहण्याविषयी सांगण्यात आले त्यावेळी मुळ अर्जदार मयत झाल्याचे समजल्याने सदरचा वारस अभिलेखावर घेण्याचा अर्ज दाखल करण्यास १ वर्षे, २ महिना आणि ११ दिवसांचा विलंब झाला आहे. सदर अर्जदार यांनी मुळ अर्जदार यांच्या मृत्युच्या दाखल्याची प्रमाणित प्रत निशाणी क्र.१५ आणि प्रस्तुत अर्जाचे पृष्ठयर्थ प्रतिज्ञापत्र निशाणी क्र.२३ अभिलेखावर दाखल केले आहे.

३. प्रस्तुत अर्जास विरोध करताना, सामनेवाला क्र.१ व २ यांनी निशाणी क्र.३८ वर म्हणणे सादर करुन प्रस्तुत अर्जास सक्त हरकत नोंदवुन अर्ज

फेटाळण्याची विनंती केली आहे. सामनेवाला क्र.३ यांना पुरेशी संधी देऊनही म्हणणे सादर न केल्याने त्यांचे म्हणण्याशिवाय अर्ज चालविण्यात आला.

४. अर्जदारातर्फे वकील तसेच सामनेवाला क्र.१ व २ तर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री.योगेश तेंडुलकर यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

०५. अर्जदार यांनी दिलेला अर्ज, सामनेवाला क्र.१ व २ यांनी दिलेले म्हणणे याचे अवलोकन केले. प्रस्तुतच्या अर्जान्वये अर्जदाराने भुसंपादित जमिनीच्या वाढीव मोबदल्याची मागणी केली आहे. मुळ अर्जदार क्र.१४ मयत झाल्याने वारस अभिलेखावर घेण्यासाठी १ वर्षे, २ महिने आणि ११ दिवसांचा विलंब झालेला दिसुन येत आहे. विलंब माफीचे अर्ज सहानुभुतीपुर्वक विचार करणे संयुक्तीक आहे. अर्जदार यांनी प्रस्तुत अर्जातील दिलेली कारणे संयुक्तीक असुन अर्ज मंजुर करणे न्यायाचे होईल. असा निष्कर्ष नोंदवुन खालील आदेश पारित करण्यात येतो.

**:: <u>आदेश</u> ::**

१. अर्जदार यांचा वारस अभिलेखावर घेण्यास झालेल्या विलंबाचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

JADHAV HEMLATA RAVINDRA

Digitally signed by JADHAV HEMLATA RAVINDRA
Date: 2026.01.16 10:53:28 +0530

(**श्रीमती एच.आर.जाधव**)
दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, महाड

महाड
दिनांक १५.०१.२०२६